## ३रे सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, माळशिरस यांचे न्यायालयात

नियमीत दिवाणी दावा क्र. ३९/२०२४

*रमेश जाधव वि. लक्ष्मी इंगोले वगैरे*

## आदेश निशाणी क्रमांक १६ खाली

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी मुळ दाव्यास कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब माफी करीता दाखल केला आहे.

२. प्रतिवादी यांनी असे नमूद केले की, त्यांना वेळेत आवश्यक ते कागदपत्रे मिळाली नसल्याने ते कैफियत देवू शकले नाहीत. प्रतिवादीने जाणीपूर्वक विलंब केला नाही. जर परवानगी न दिल्यास प्रतिवादी यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. म्हणून अर्ज.

३. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता दिसून येते की, प्रतिवादी हे दाव्याकामी त्यांची कैफीयत ९० दिवसाच्या आत सादर केली नाही. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ८ नियम १ नुसार प्रतिवादी यांच्यावर समन्स बजावल्यापासून ३० दिवसांच्या आत त्यांच्या बचावाची लेखी कैफीयत सादर करतील परंतू उक्त ३० दिवसांच्या मुदतीत लेखी कैफीयत दाखल करण्यास प्रतिवादीने कसुर केल्यास न्यायालयाने विर्निदिष्ट केले असेल अशा अन्य दिवशी ते लेखी कारण नमुद करुन दाखल करता येईल, मात्र असा दिवस समन्स बजावल्याच्या तारखेपासून ९० दिवसांपेक्षा नंतरचा असणार नाही.

४. वरील दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ८ नियम १ ची तरतूद विचारात घेता प्रतिवादी यांना लेखी म्हणणे समन्स प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत दाव्यात दाखल करणे अपेक्षीत होते परंतू प्रतिवादी यांनी प्रस्तुत दाव्यात दिनांक २८.१०.२०२५ रोजी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जावर वादी यांनी

म्हणणे दाखल आहे. वादी यांनी अर्ज मंजूर होण्यास हरकत घेतले असून अर्ज खर्चासह नामंजूर होण्याचे विनंती केली.

५. प्रतिवादी यांच्या विधीज्ञांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

६. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुतचे प्रकरण हे प्रतिवादीविरुध्द निरंतर ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. दावा मिळकतीमध्ये दोन्ही पक्षकारांचे हित जोपासलेले आहे. त्यामुळे दावा मिळकती संबंधीचे वाद गुणदोषावर अंतिमतः निकाली काढण्याकरीता प्रतिवादी यांना दाव्यात हजर होवून त्यांना लेखी कैफीयत व म्हणणे मांडण्याची संधी देणे न्यायोचित ठरेल. तसेच त्यांना संधी न दिल्यास ते नैसर्गीक न्यायतत्वाच्या विरुध्द ठरेल. सदर मिळकती संबंधी भविष्यात अनेक दावे टाळण्याच्या दृष्टीने प्रतिवादी यांना दाव्याच्या कामकाजात सहभागी होण्याची एक संधी देणे संयुक्तीक व रास्त ठरेल. म्हणून आदेश.

## **आदेश**

१. अर्ज रक्कम रुपये ५००/- खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांनी खर्चाची रक्कम वादीस पुढील तारखेपर्यंत किंवा त्या आधी द्यावी.

३. प्रतिवादी यांनी वरीलप्रमाणे खर्चाची पूर्तता केल्यानंतर त्यांना झालेला विलंब माफ करण्यात येतो.

Digitally signed by GULFARAZ MAQSOOD BIRADAR
Date: 2026.04.16 17:26:35 +0530

(गुलफराज़ एम. बिरादार)

दिनांक १६/०४/२०२६

३रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
माळशिरस